**महाराष्ट्र राज्य डेटा केंद्र (MH-SDC) यंत्रणेच्या कामकाजाचे हस्तांतरण व महाराष्ट्र राज्य डेटा केंद्र (MH-SDC) चे सर्वसमावेशक ऑपरेशन व मेंटेनन्स (O&M) चे कार्य हाती घेण्यास माहिती तंत्रज्ञान महामंडळाला प्राधिकृत करण्यास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत....**

**महाराष्ट्र शासन**

**सामान्य प्रशासन विभाग (मातं)**

**शासन निर्णय क्रमांक : SDC-२०२६/C.R.३६/IT**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: २४ फेब्रुवारी, २०२६

<u>वाचा:</u>

१. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र सीओएम-१०९८/प्र.क्र. २१२/९८/३९, दि. ०५.१०.२००१
२. माहिती तंत्रज्ञान उच्चाधिकार समितीची दि. ०३.०२.२०२६ रोजी झालेली १८७ वी बैठक-अजेंडा क्र. १०

<u>प्रस्तावना :</u>

राज्य डेटा सेंटर सेवा अखंडितपणे सुरू राहाव्यात यासाठी महाराष्ट्र राज्य डेटा केंद्र (MH-SDC) यंत्रणेचे डेटा सेंटर ऑपरेशन्स, NOC, BMS आणि SOC या कामकाजाचे हस्तांतरण महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाकडे मंजूर करण्यास तसेच मंजूर RFP नुसार आवश्यक मनुष्यबळासह महाराष्ट्र राज्य डेटा केंद्र (MH-SDC) चे सर्वसमावेशक ऑपरेशन व मेंटेनन्स (O&M) चे कार्य हाती घेण्यास माहिती तंत्रज्ञान महामंडळाला अधिकृत करण्याबाबतचा प्रस्ताव उच्चाधिकार समितीच्या मान्यतेस्तव सादर करण्यात आला होता. त्यानुषंगाने माहिती तंत्रज्ञान उच्चाधिकार समितीच्या (IT-HPC) दि. ०३.०२.२०२६ रोजी झालेल्या १८७ व्या बैठकीत अजेंडा क्र. १० अंतर्गत महाराष्ट्र राज्य डेटा केंद्र (MH-SDC) यंत्रणेच्या कामकाजाचे हस्तांतरण व महाराष्ट्र राज्य डेटा केंद्र (MH-SDC) चे सर्वसमावेशक ऑपरेशन व मेंटेनन्स (O&M) चे कार्य हाती घेण्यास माहिती तंत्रज्ञान महामंडळाला प्राधिकृत करण्यास मंजुरी देण्यात आली आहे.

**शासन निर्णय :**

मा. मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखालील माहिती तंत्रज्ञान उच्चाधिकार समितीच्या १८७ व्या बैठकीतील अजेंडा क्र. १० अन्वये देण्यात आलेल्या मान्यतेस अनुसरुन महाराष्ट्र राज्य डेटा केंद्र (MH-SDC) यंत्रणेचे बळकटीकरण करण्याच्या अनुषंगाने आवश्यक असलेले महाराष्ट्र राज्य डेटा केंद्र (MH-SDC) यंत्रणेच्या कामकाजाचे हस्तांतरण व महाराष्ट्र राज्य डेटा केंद्र (MH-SDC) चे सर्वसमावेशक ऑपरेशन व मेंटेनन्स (O&M) चे कार्य हाती घेण्यास माहिती तंत्रज्ञान महामंडळाला प्राधिकृत करण्यास तसेच त्याकरिता येणा-या प्रत्यक्ष खर्चावर माहिती तंत्रज्ञान महामंडळ व्यवस्थापन शुल्क @ ५% देण्यास मंजुरी दिली असून दरवर्षी अंदाजे ₹ ६.९६ कोटी (Indicative) इतक्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर प्रकरणी संचालक, माहिती तंत्रज्ञान संचालनालय यांना आवश्यक अटी व शर्तींची पूर्तता करून कार्यादेश निर्गमित करण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. सदर विषयी येणारा खर्च मागणी क्र. A-०४, मुख्य लेखाशिर्ष (२०५२)-सचिवालयीन सर्वसाधारण सेवा (२०५२ ०५८२) (०९०) (००) (११), “३१-सहायक अनुदाने” लेखाशिर्षाअंतर्गत राज्य सेतु सोसायटीमार्फत ई-गव्हर्नन्स प्रकल्पाकरिता सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी मंजूर अर्थसंकल्पिय तरतूदीमधून भागविण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

४. उपरोक्त खर्चाकरिता लेखाधिकारी, माहिती तंत्रज्ञान संचालनालय, मुंबई हे आहरण व संवितरण अधिकारी व उपसचिव, माहिती तंत्रज्ञान हे नियंत्रक अधिकारी असतील.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०२६०२२४१७२२५०१७०७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने स्वाक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

Digitally signed by DURGAPRASAD POCHAYYA MYLAWARAM
Date: 2026.02.24 17:25:23 +05'30'

**(दुर्गाप्रसाद मैलावरम)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत:**

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई

२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. महाराष्ट्र विधान परिषद सभापती यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई
४. मा. महाराष्ट्र विधान सभा अध्यक्ष यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई
५. मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
६. सर्व मा. मंत्री/मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७. मा. विरोधी पक्ष नेता, विधान परिषद, विधान भवन, मुंबई
८. मा. विरोधी पक्ष नेता, विधान सभा, विधान भवन, मुंबई
९. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
१०. शासनाचे सर्व मा. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई
११. मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय,
१२. प्रबंधक, लोकायुक्त व उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
१३. महालेखापाल १/२ लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
१४. महालेखापाल १/२ लेखा व परीक्षा, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
१५. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, महाराष्ट्र राज्य,
१६. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई,
१७. संचालक, माहिती तंत्रज्ञान संचालनालय, मुंबई,
१८. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित,
१९. निवडनस्ती/मातं.